


विनय इलेक्ट्रिशियनचे ग्रुपतर्फे वायरमनच्या विविध समस्यांसाठी झालेल्या चर्चा सत्राचे उद्घाटन करताना समवेत. निलेश बंबोरीया, किशोर ओसवाल, सुरेश गांधी, बी. आर. वाघ, डॉ. सचिन बोरा, निलेश गांधी, भारत वाघ आदी दिसत आहेत.

## विनय इलेक्ट्रिशियनतर्फे वायरमन्ससाठी चर्चासत्र

# विजेचा तुटवडा ही देशासमोरील मोठी समस्या

### किशोर ओसवाल यांचे प्रतिपादन

नगर– विजेचा तुटवडा ही देशासमोरील मोठी समस्या आहे. त्यासाठी वीज वाचवणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन विनय इलेक्ट्रिशियन ग्रुपचे महाराष्ट्राचे वितरक किशोर ओसवाल यांनी केले. विनय इलेक्ट्रिशियनचे ग्रुपतर्फे वायरमनच्या विविध समस्यांसाठी झालेल्या चर्चासत्रात उद्घाटनाप्रसंगी ते बोलत होते.

अंकुर लॉन या ठिकाणी झालेल्या चर्चा सत्रामध्ये विनय ग्रुपचे महाराष्ट्राचे मॅनेजर निलेश बंबोरीया यांनी कंपनीच्या उत्पादनाची माहिती दिली. एल.ई.डी. प्रॉडक्ट व सेन्सर यांच्या नव्या उत्पादनाची माहिती दिली. यावेळी महाराष्ट्राचे वितरक किशोर ओसवाल, बी. आर. वाघ, भारत वाघ अहमदनगरचे वितरक, नूतन इलेक्ट्रिकलचे सुरेश गांधी, आनंद इलेक्ट्रिकलचे निलेश गांधी, डॉ. सचिन बोरा आदी उपस्थित होते.

आयोजित चर्चासत्रात जिल्हाभरातून आलेल्या वायरमनच्या अनेक समस्याची यावेळी मोकळेपणाने चर्चा करण्यात आली.

किशोर ओसवाल यांनी वायरमनच्या तांत्रिक अडचणी, प्रश्नांची उत्तरे देवून शंकेचे समाधान केले. यावेळी चांगले प्रश्न विचारणाऱ्यांना विशेष बक्षिसे देण्यात आली.

सुरेश गांधी यांनी मान्यवरांचे स्वागत केले. भारत वाघ यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. निलेश गांधी यांनी आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली. जिल्हाभरातून वायरमन सहभागी झाले होते.

ग्य

स्पिटलची
सून, या
सामाजिक
त नाहीत.
सहभाग
असून,
पुढे चालू
दऋषीजी
वो, असे

वतीने
र व्यक्त
सलेल्या
टसॉप व
न याची
गे करून
शिबिरांचा
फायदा

नी या
शुभेच्छा
सांचा हा
शामध्ये
ण्णांच्या
ी सेवा
लमध्ये
चांगली
असेच
गून या
र यांनी